शनिवार, दि. ०१ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना मनपाच्या स्थायी समितीत पाणीपुरवठा योजनेच्या निविदेवर निर्णय स्थगित

* दर जास्त असल्याने निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलावण्याचे निर्देश
* विभागप्रमुखांना तीन दिवसांत अनुपालन अहवाल सादर करण्याचा आदेश

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा शुक्रवारी (दि. ३१) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृहात स्थायी समितीचे सभापती अशोक (उर्फ लक्ष्मीकांत) मनोहरराव पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेत शहराच्या पाणीपुरवठा योजनेसह विविध प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः जालना पाणीपुरवठा योजनेच्या निविदेतील दर अपेक्षेपेक्षा





जास्त असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित निविदाधारकांना वाटाघाटीसाठी बोलावून त्यानंतरच विषय पुढील स्थायी समितीच्या बैठकीत पुन्हा सादर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सभेला स्थायी समितीचे सदस्य, उपायुक्त, उपायुक्त-२, नगरसचिव, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या (पान २ वर)

## सर्व समाजासाठी विवाहाची सुवर्णसंधी; साजन सरितातर्फे दर रविवारी वधू-वर नोंदणी कॅम्प

व्हॉट्सअॅपवरूनही नोंदणीची सुविधा

**जालना । प्रतिनिधी**

गेल्या जवळपास दोन दशकांपासून विश्वास, पारदर्शकता आणि यशस्वी नातेसंबंधांची सेवा देणाऱ्या साजन सरिता मॅट्रिमोनियल सर्व्हिसेसच्या वतीने सर्व समाजातील विवाह इच्छुक युवक-युवतींसाठी दर रविवारी वधू-वर नोंदणी कॅम्प आयोजित करण्यात येत आहे.

''विश्वास, पारदर्शकता आणि यशस्वी नात्यांचा सेतू'' हे ब्रीद घेऊन २००७ पासून कार्यरत असलेल्या संस्थेने विवाह जुळविण्याच्या प्रक्रियेला अधिक सुलभ, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक बनविण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

या विशेष नोंदणी कॅम्पमध्ये सर्व समाजातील वधू-वरांची नोंदणी केली जाणार असून, विवाहासाठी योग्य स्थळ शोधणाऱ्या कुटुंबांना अनुभवी मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. संस्थेकडे नवीन नोंदणी, प्रोफाइल तयार करण्यासाठी मार्गदर्शन तसेच योग्य स्थळांची माहिती देण्याची सुविधा उपलब्ध आहे. संस्थेने नोंदणी शुल्क निश्चित केले असून, या शुल्कामध्ये संपूर्ण (पान २ वर)

## विरेगाव शिवारात हरणांचा धुमाकूळ; कोवळ्या खरीप पिकांचे मोठे नुकसान

*वन्य प्राण्यांचा कहर; सोयाबीन, तूरसह विविध पिकांवर हरणांचे आक्रमण, शेतकऱ्यांची तातडीच्या उपाययोजनांची मागणी*

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील विरेगाव शिवारात गेल्या काही दिवसांपासून हरणांच्या मोठ्या कळपांचा वावर वाढला असून, या कळपांनी शेतात घुसून कोवळ्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत. यंदा आधीच अत्यल्प आणि उशिरा झालेल्या पावसामुळे खरीप हंगाम संकटात असताना वन्य प्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांपुढे नव्या आर्थिक संकटाची भर पडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी (दि. ३०) दुपारी विरेगाव परिसरातील अनेक शेतांमध्ये हरणांचे कळप घुसल्याने सोयाबीन, तूर तसेच इतर खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली. नुकतीच उगवलेली कोवळी पिके हरणांनी खाल्ल्याने अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काही शेतांमध्ये पिके अक्षरशः जमिनदोस्त झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

यंदाच्या हंगामात पावसाने वेळेवर हजेरी न लावल्याने शेतकऱ्यांना पेरणी लांबवावी लागली. अनेकांनी कर्ज काढून बियाणे, खते आणि मशागतीवर मोठा खर्च केला. त्यानंतर झालेल्या अल्प पावसामुळे पिकांची वाढही संथ राहिली. अशा परिस्थितीत उगवलेली पिके जगतील, अशी अपेक्षा असतानाच हरणांच्या कळपांनी शेतांमध्ये धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर अक्षरशः पाणी फिरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दिवसा आणि रात्री अशा दोन्ही वेळा (पान २ वर)

## वीज खांबातून करंट उतरल्याने बैलाचा मृत्यू

तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांचा महावितरणकडे पाठपुरावा; पंचनामा करून मदतीची मागणी

**मंठा -प्रतिनिधी**

शेतातील वीज खांबातून विद्युतप्रवाह उतरल्याने बैलाला विजेचा जोरदार धक्का बसून त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना तळतोंडी येथे शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास घडली. बैलाच्या कासऱ्याला हात असल्याने शेतकरी उद्धव भाऊराव गोटे यांनाही विजेचा धक्का बसला. त्यांच्यावर मंठा येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर आहे.

गोटे हे बैलजोडीसह शेतात चारण्यासाठी गेले होते. त्यावेळी वीज खांबातून जमिनीत विद्युतप्रवाह उतरल्याने एका बैलाला अचानक विजेचा धक्का बसला. काही क्षणांतच बैलाचा मृत्यू झाला. बैलाला वाचविण्याच्या प्रयत्नात कासऱ्याला हात असल्याने गोटे यांनाही विजेचा धक्का बसला.

या घटनेत गोटे यांचा एक बैल मृत्युमुखी पडल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. बैलजोडीची किंमत सुमारे दीड लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. शेतीच्या कामासाठी आवश्यक असलेली बैलजोडी गमावल्याने गोटे कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले आहे.

**महावितरणकडे पाठपुरावा**

घटनेची माहिती मिळताच शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी



महावितरणच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. घटनेचा तातडीने पंचनामा करून गोटे यांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

शेतातील वीज खांब व विद्युतवाहिन्यांची पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती करावी आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत, या साठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही बोराडे यांनी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला तातडीने मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जालना महानगरपालिकेचे सभा लिपिक बंडू चव्हाण सेवानिवृत्त नगरसेवक, अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून भावनिक निरोप

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेचे ज्येष्ठ सभा लिपिक बंडू चव्हाण हे तब्बल ४१ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३० जुलै २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी, सभापती आणि नगरसेवक भावूक झाले. अनेकांनी त्यांच्या प्रामाणिक, संयमी आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याच्या स्वभावाच्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण



निरोप दिला. बंडू चव्हाण यांनी ४१ वर्षांपूर्वी जालना नगरपंचायतीत सफाई कामगार म्हणून सेवेला सुरुवात केली होती. मेहनत, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेच्या जोरावर त्यांनी पुढे लिपिक म्हणून पदोन्नती मिळवली. नगरपरिषद ते महानगरपालिका असा प्रवास करत त्यांनी अखेर सभा लिपिक म्हणून जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली. त्यांच्या सेवाकाळात त्यांनी सभागृहाचे कामकाज शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पाडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

स्थायी समितीचे सभापती अशोक अण्णा पांगाकर यांनी बोलताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. ''टेंडर मंजुरीच्या प्रक्रियेत बंडू चव्हाण यांनी कधीही कोणालाही अडचणीत आणले नाही. त्यांनी कोणाचेही मन दुखावले नाही. त्यांचा स्वभाव अत्यंत मोकळा (पान २ वर)

## व्यसनमुक्त भारतासाठी युवकांचा जागर

### जिल्हास्तरीय 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' स्पर्धा उत्साहात संपन्न

**जालना- प्रतिनिधी**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत, जालना व डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिल्हास्तरीय नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' स्पर्धेचे आयोजन डि.जे.पी. कॅम्पस, रेवगाव रोड, जालना येथे उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार



गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

स्पर्धेत चित्रकला, घोषवाक्य लेखन, भाषण, लोकनृत्य, लोकगीत, रिल निर्मिती, पथनाट्य आणि मौखिक कविता अशा आठ विविध स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारताचा संदेश प्रभावीपणे सादर करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व धन्वंतरी प्रार्थनेने झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन सहायक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजु यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून सहायक आयुक्त (कौशल्य विभाग) गणेश (पान २ वर)

## पाऊस पडला... प्रशासन जागे झाले! पाहणी दौरे, आश्वासने अन् नागरिकांचा तोच प्रश्न एकच कायमस्वरूपी उपाय कधी?

नालेसफाईच्या दाव्यांवर पाण्यानेच उपस्थित केले प्रश्नचिन्ह; जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?





**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात झालेल्या मुसळधार पावसाने पुन्हा एकदा महानगरपालिकेच्या पावसाळापूर्व तयारीच्या दाव्यांची परीक्षा घेतली. काही तासांच्या पावसातच शहरातील अनेक प्रमुख रस्ते जलमय झाले, सखल भागांत पाणी तुंबले, तर काही नागरिकांच्या घरांमध्ये आणि व्यापारी आस्थापनांमध्ये पाणी शिरल्याने मोठी गैरसोय झाली. पाऊस ओसरताच प्रशासनाने आयुक्त अंजली शर्मा, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत आणि नगरसेवकांसह विविध भागांचा पाहणी दौरा केला. मात्र, प्रत्येक वर्षी पाऊसानंतर होणाऱ्या अशा पाहणी दौऱ्यांनी प्रश्न सुटतात का, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

महानगरपालिकेकडून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई, पाण्याचा निचरा आणि आपत्कालीन नियोजन झाल्याचे दावे केले जातात. परंतु प्रत्यक्षात पहिल्याच जोरदार पावसात अनेक भाग जलमय होतात. मग लाखो रुपयांचा खर्च नेमका कुठे झाला? नालेसफाईची कामे दर्जेदार झाली होती का? संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तपासणी केली होती का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत.

पाहणीदरम्यान गायत्रीनगर, कोठारीनगर, जुना मोंढा, सीटीएमके शाळा परिसर, टाऊन हॉल परिसर आदी ठिकाणी भेट देऊन अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. मात्र, सूचना देण्याची ही वेळ का आली? पावसापूर्वीच संवेदनशील भागांमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना का राबविल्या गेल्या नाहीत? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

आयुक्त अंजली शर्मा यांनी नाल्यांच्या साफसफाईचा सकारात्मक परिणाम दिसत असल्याचा दावा केला आहे. महापौर वंदना मगरे यांनी कर्मचारी युद्धपातळीवर काम करत असल्याचे सांगितले, तर उपमहापौर राजेश राऊत यांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. मात्र नागरिकांचे म्हणणे स्पष्ट आहे. आश्वासने नकोत, परिणाम हवेत.

दरवर्षी पावसामुळे घरांमध्ये पाणी शिरते, व्यापाऱ्यांचे नुकसान होते, वाहतूक विस्कळीत होते आणि नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. तरीही जबाबदारी निश्चित होत नाही. कोणत्या अधिकाऱ्याने नालेसफाईची कामे तपासली? कुठे त्रुटी राहिल्या? त्या त्रुटींसाठी (पान २ वर)

# संपादकीय पान

## पाहणी नव्हे, कायमस्वरुपी उपायांची गरज!

जालना शहरात गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसाने पुन्हा एकदा शहराच्या नागरी नियोजनातील उणिवा उघड्या पाडल्या. जुना जालना असो, माऊली नगर असो किंवा इतर सखल भाग, प्रत्येक पावसात जलभरावाची पुनरावृत्ती ही आता अपवाद नसून नित्याची बाब झाली आहे. रस्ते जलमय होणे, घरांमध्ये व दुकानांमध्ये पाणी शिरणे, वाहतूक ठप्प होणे आणि नागरिकांचे आर्थिक नुकसान होणे, हे चित्र वर्षानुवर्षे बदलत नाही. त्यामुळे आता प्रश्न केवळ पावसाचा राहिलेला नाही, तर शहराच्या नियोजनाचा, प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा आणि लोकप्रतिनिधींच्या उत्तरदायित्वाचा आहे.

महापौर वंदना मगरे यांनी घटनास्थळी जाऊन नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या, अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आणि तातडीच्या उपाययोजनांचे आदेशही दिले. लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची तत्परता निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहेपाहणी आणि आदेश यांचे प्रत्यक्ष कामात रूपांतर कधी होणार? जुना जालना परिसरात नालेसफाई वेळेवर झाली असती, नाल्यांवरील अतिक्रमणे हटवली गेली असती आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था सक्षम असती, तर आज रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले नसते. प्रत्येक वर्षी कोट्यवधी रुपये स्वच्छता, नालेसफाई आणि पायाभूत सुविधांवर खर्च होत असल्याचा दावा केला जातो. मग प्रत्येक पावसात शहर जलमय का होते? हा प्रश्न प्रशासनाने स्वतः ला विचारण्याची वेळ आली आहे. माऊली नगरातील परिस्थितीने आणखी एक गंभीर मुद्दा पुढे आणला आहे. गेल्या वर्षी अंडरग्राऊंड गाळ्यांमध्ये शिरलेल्या पाण्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. अनेकांचे पंचनामे झाले नाहीत, भरपाई मिळाली नाही आणि या घटनेतून प्रशासनाने काही धडा घेतल्याचेही दिसले नाही. यंदाही त्याच प्रकारच्या घटना घडत असल्याने, केवळ आपत्कालीन उपाय पुरेसे ठरणार नाहीत. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शहरातील सर्व अंडरग्राऊंड व्यावसायिक संकुले, पार्किंग आणि बांधकामांची तांत्रिक तपासणी होणे आवश्यक आहे. मंजूर नकाशांप्रमाणे बांधकामे झाली आहेत का, जलनिस्सारणाची व्यवस्था सक्षम आहे का आणि नियमांचे उल्लंघन तर झालेले नाही ना, याची सखोल चौकशी झाली पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हवामानातील बदल. अतिवृष्टीच्या घटना आता अधिक तीव्र होत आहेत. त्यामुळे अनेक दशकांपूर्वीची जलनिस्सारण व्यवस्था आजच्या परिस्थितीसाठी अपुरी ठरत आहे. शहराच्या वाढत्या विस्तारानुसार नव्या नाल्यांचे नियोजन, मोठ्या क्षमतेची ड्रेनेज व्यवस्था, पावसाच्या पाण्याचा स्वतंत्र निचरा, जलसाठा निर्माण करणाऱ्या संरचना आणि डिजिटल पूर व्यवस्थापन प्रणाली यांसारख्या उपाययोजनांची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक वर्षी प्रशासन पाहणी करेल, नागरिक नुकसान सहन करतील आणि पुढच्या पावसात पुन्हा तीच कथा घडेल.

या संपूर्ण प्रकरणात नागरिकांचीही जबाबदारी कमी नाही. नाल्यांमध्ये प्लास्टिक, कचरा आणि बांधकामाचा मलबा टाकण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे. स्वच्छ शहर ही केवळ महापालिकेची जबाबदारी नसून नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी आहे. मात्र, नागरिकांनी जबाबदारी पाळली तरी प्रशासनाने आपली कर्तव्ये वेळेत पार पाडली नाहीत, तर परिस्थिती बदलणार नाही.

आता महापालिकेसमोर एक मोठी संधी आहे. नुकतेच लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. त्यामुळे केवळ तात्पुरत्या उपायांवर न थांबता शहरासाठी दीर्घकालीन पूरनियंत्रण आराखडा तयार करणे, जलनिस्सारण यंत्रणेचे आधुनिकीकरण करणे, अतिक्रमणांवर कठोर कारवाई करणे आणि झालेल्या नुकसानीबाबत पारदर्शक भरपाई व्यवस्था उभी करणे, ही काळाची गरज आहे.

शहराचा विकास केवळ नवीन रस्ते, इमारती आणि सौंदर्यीकरणाने होत नाही; तर पहिल्याच पावसात नागरिकांचे घर सुरक्षित राहते का, रस्त्यावर पाणी साचत नाही का आणि प्रशासन संकटाच्या वेळी परिणामकारक ठरते का, यावरही तो मोजला जातो. जालन्याच्या नागरिकांना आता पाहण्या, बैठका आणि आश्वासनांची नव्हे, तर कायमस्वरूपी आणि परिणामकारक उपाययोजनांची अपेक्षा आहे. कारण प्रत्येक पावसात बुडणारे शहर ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, ती नियोजनातील कमतरतेची आणि व्यवस्थेतील त्रुटीची जिवंत साक्ष आहे.

## तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेअंतर्गत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

**जालना – प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना कार्यालयामार्फत ''तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजना'' अंतर्गत जिल्ह्यातील तृतीयपंथीय व्यक्तींसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. तृतीयपंथीयांची कार्यशाळा दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेमध्ये तृतीयपंथीय व्यक्तींचे हक्क, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, सामाजिक सुरक्षा, ओळखपत्रे, कायदेशीर संरक्षण तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच उपस्थित तृतीयपंथीयांच्या समस्या व अडचणी जाणून घेऊन त्यावर आवश्यक मार्गदर्शन व उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीय व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# भारतीय शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी चिंताजनक

भारतात शिक्षण हा यशाचा सर्वात मोठा मार्ग मानला जातो. परंतु इतर देशात विद्यार्थ्यांची आवड विचारात घेऊन त्यांच्या आवडीनुसार शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे इतर देशांनी केवळ शिक्षणाच्या बळावर आपला सर्वांगीन विकास साधला आहे. परंतु आपल्या देशातील शिक्षणपद्धती ही सक्तीची आहे. ज्यामुळे शिक्षण विभागाने ठरविलेले विषय हे विद्यार्थ्यांना घ्यावेच लागते. मग त्या विषयात रस असो किंवा नसो. यामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचा -हास होतो. शिक्षण आणि बेरोजगारीचा संबंध हा एक गुंतागुंतीचा मुद्दा आहे जो कोणत्याही देशाच्या सामाजिक आणि आर्थिक रचनेवर परिणाम करतो. एका बाजूला शिक्षणाला चांगल्या रोजगाराच्या संधींचे प्रवेशद्वार मानले जाते, तर दुस-या बाजूला सुशिक्षित तरुणांमधील वाढती बेरोजगारी ही एक गंभीर चिंतेची बाब बनत चालली आहे. अलीकडच्या वर्षांत भारत आणि जगाच्या अनेक भागांमध्ये सुशिक्षित बेरोजगारी एक मोठे आवाहन म्हणून उदयास आली आहे. याचा अर्थ असा की, उच्च शिक्षण घेऊनही मोठ्या संख्येने तरुण नोकरी शोधण्यात असमर्थ आहेत. ही परिस्थिती केवळ वैयक्तिक निराशेचे कारण बनत नाही, तर राष्ट्रीय विकासातही अडथळा आणते. बेरोजगारीची अनेक कारणे असली तरीही विद्यापीठे अनेकदा बाजारात मागणी असलेली कौशल्ये शिकवत नाहीत. अनेक शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसे ज्ञान आणि कौशल्ये मिळत नाहीत.

कौशल्य अंतराची समस्या आजचा बाजार वेगाने बदलत आहे आणि नवीन कौशल्यांची मागणी करत आहे. आपली शिक्षण प्रणाली अनेकदा या बदलत्या गरजांशी जुळवून घेत नाही. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नाही; दर्जेदार शिक्षण महत्त्वाचे आहे. कमकुवत अभ्यासक्रम, अप्रशिक्षित शिक्षक आणि जुन्या शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक रोजगार बाजारासाठी तयार करत नाहीत. ही एक अशी समस्या आहे जी सुशिक्षित बेरोजगारीला आणखी वाढवते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तरुण लोकसंख्येपैकी एक आहे, ज्याला अनेकदा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश म्हणून गौरवले जाते. तरीही एक विरोधाभास आहे. भारत दरवर्षी लाखो अभियंते, एमबीए आणि पदवीधर तयार करतो, पण बेरोजगारीचा दर मात्र कमी करू शकत नाही. शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढत्या दरीमुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो: आपण आपल्या विद्यार्थ्यांना बाजारपेठेला आवश्यक असलेली कौशल्ये देत आहोत का?

आजची शिक्षणपद्धती आणि वाढती बेरोजगारी यांच्यात गंभीर विसंगती निर्माण झाली असून पदवीधर तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. पारंपारिक ज्ञान देणारी शिक्षणप्रणाली, प्रात्यक्षिक कौशल्यांचा अभाव आणि उद्योगांच्या बदलत्या गरजा या प्रमुख समस्या आहेत. प्रात्यक्षिक व कृतीशील शिक्षणाऐवजी केवळ पाठमोरे आणि पदवी मिळवण्यापुरते शिक्षण, कौशल्यांची तफावत, बाजारातील मागणीनुसार आवश्यक असणारे तांत्रिक व संवादात्मक कौशल्ये विद्यार्थ्यांकडे नसतात. ज्यामुळे पदवीधर तरुणांना सामावून घेणारे उद्योग व सेवा क्षेत्रातील नवीन संधी अपु-या पडत आहेत.

एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षांत शिक्षणाचा खर्च झपाट्याने वाढत असताना उच्चशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी ही चिंताजनक पातळीवर पोहोचली आहे. त्यामुळे लाखो रुपये खर्च करून पदवी किंवा व्यावसायिक शिक्षण पूर्ण करणा-या अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित नोकरी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे. शिक्षणाचा वाढता खर्च, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि कौशल्यांतील तफावत यामुळे विद्यार्थी आणि पालक दोघांवरही आर्थिक व मानसिक ताण वाढत असल्याचे विविध अहवाल आणि तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

आज केवळ शाळा किंवा महाविद्यालयाची फी भरून शिक्षण पूर्ण होत नाही. शिकवण्या, स्पर्धा परीक्षा कोचिंग, डिजिटल उपकरणे, इंटरनेट, वाहतूक, गणवेश, पुस्तके, प्रोजेक्ट, वसतिगृह आणि इतर उपक्रमांवरही मोठा खर्च करावा लागतो. अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मुलांच्या शिक्षणाचा खर्च हा घर खरेदी किंवा इतर मोठ्या आर्थिक जबाबदा-यांइतकाच महत्त्वाचा बनला आहे. परिणामी अनेक पालक आपली बचत मोडतात, कर्ज घेतात किंवा इतर गरजा पुढे ढकलून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देतात.

उच्चशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असली तरी त्याच प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्माण होत नसल्याचे अहवालातून स्पष्ट होत आहे. अनेक पदवीधर महिनोनमहिने नोकरीच्या शोधात असतात. काहींना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित नसलेल्या क्षेत्रात कमी पगारावर काम स्वीकारावे लागते, तर काही जण स्पर्धा परीक्षा किंवा सरकारी नोकरीच्या तयारीत अनेक वर्षे घालवतात. यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही आर्थिक स्वावलंबन लांबणीवर पडत असल्याचे दिसून येते.

देशाचा एकूण बेरोजगारी दर तुलनेने नियंत्रित असला तरी तरुणांमधील बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. शिक्षणासाठी घेतलेले कर्ज, वाढत्या फी आणि नोकरीबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक दबाव वाढत आहे. दुसरीकडे, विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा, अपेक्षा आणि करिअरची चिंता वाढल्याने मानसिक ताणही मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. शिक्षणावर केलेली मोठी गुंतवणूक अपेक्षित परिणाम देत नसल्यास निराशा वाढू शकते. त्यामुळे शिक्षणासोबत करिअर मार्गदर्शन, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम यांवर भर देण्याची आवश्यकता अधोरेखित होत आहे. शिक्षणव्यवस्था आणि रोजगार बाजार यांच्यात अधिक सुसंगती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. उद्योगांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम अद्ययावत करणे, कौशल्याधारित प्रशिक्षण वाढवणे, इंटर्नशिपला प्रोत्साहन देणे, नवउद्योजकतेसाठी अनुकूल वातावरण तयार करणे आणि अधिक दर्जेदार रोजगार निर्माण करणे यावर भर दिल्यास परिस्थितीत सुधारणा होऊ शकते. शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन न राहता रोजगारक्षम कौशल्ये विकसित करणारी प्रक्रिया बनल्यास तरुणांना अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतील यात काही दुमत नाही.

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

# पान १ व ४ वरुन...

### सर्व समाजासाठी....

वर्षभरासाठी पसंतीचे स्थळ निवडण्याची सुविधा दिली जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. अल्प शुल्कात अधिकाधिक विवाह इच्छुकांना दर्जेदार आणि विश्वासार्ह सेवा मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ज्यांना प्रत्यक्ष कॅम्पमध्ये उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांच्यासाठीही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संबंधितांनी आपला बायोडाटा आणि छायाचित्र व्हॉट्सॲपवर पाठवूनही नोंदणी करू शकणार आहेत. त्यामुळे जालना जिल्ह्यासह इतर भागातील विवाह इच्छुकांनाही या सेवेचा लाभ घेणे सोपे होणार आहे.

नोंदणी कॅम्प आणि इतर माहितीसाठी प्रा. कदम यांच्याशी ७०२०३५०८६२ किंवा ७९७२७४०८६२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संस्थेच्या वतीने विवाह इच्छुक युवक-युवती तसेच त्यांच्या पालकांनी या उपक्रमाचा लाभ घेऊन योग्य जीवनसाथी शोधण्यासाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जालना मनपाच्या...

प्रारंभी मागील बैठकीचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले. त्यानंतर जालना पाणीपुरवठा योजनेच्या निविदेवरील विषयावर सविस्तर चर्चा झाली. निविदाधारकाने सादर केलेले दर जास्त असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. त्यामुळे संबंधित ठेकेदारास दर कमी करण्याबाबत वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावे आणि त्यानंतर सुधारित प्रस्ताव पुढील स्थायी समितीच्या बैठकीसमोर मंजुरीसाठी ठेवावा, असे ठरविण्यात आले.

सभेत मुख्य लेखा परीक्षक राजेश्वर माने यांना अतिरिक्त कामकाजाची जबाबदारी देण्याच्या विषयावरही चर्चा करण्यात आली. तसेच पूर्व लेखा परीक्षणाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

महानगरपालिकेच्या वाहन विभागातील घंटागाड्यांसाठी चालक पुरविणाऱ्या एजन्सीला तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याचा प्रस्तावही सभेत मंजूर करण्यात आला. शहरातील स्वच्छता सेवा अखंडित सुरू राहावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

बैठकीदरम्यान स्थायी समितीचे सभापती अशोक (उर्फ लक्ष्मीकांत) पांगारकर यांनी विविध विभागप्रमुखांना स्पष्ट निर्देश दिले. सभेत सदस्यांनी केलेल्या सूचना व निर्देशांवर संबंधित विभागांनी पुढील तीन दिवसांत अनुपालन अहवाल स्थायी समिती सभापतींच्या कार्यालयात सादर करावा. अनुपालन अहवाल वेळेत सादर न करणाऱ्या विभागप्रमुखांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागातील वरिष्ठ लिपिक बंडू चव्हाण यांच्या सेवानिवृत्तीची दखलही या बैठकीत घेण्यात आली. मनपा प्रशासनात त्यांनी अनेक वर्षे प्रामाणिक व अविरत सेवा बजावल्याबद्दल स्थायी समितीच्या वतीने त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांच्या अभिनंदनाचा आणि कृतज्ञतेचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच त्यांच्या भावी आयुष्यासाठी सर्व सदस्य, पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

स्थायी समितीच्या बैठकीत पाणीपुरवठा योजनेच्या निविदेवरील निर्णय, विभागप्रमुखांना देण्यात आलेले कडक निर्देश तसेच प्रशासनातील विविध महत्त्वाच्या विषयांवर झालेल्या चर्चेमुळे ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

### विरेगाव शिवारात...

हरणांचे कळप शेतात येत असल्याने अनेक शेतकऱ्यांना रात्रभर शेतात मुक्काम करून पिकांची राखण करावी लागत आहे. फटाके, ढोल, टिनचे डबे वाजवणे, टॉर्चचा प्रकाश टाकणे अशा विविध उपायांनी हरणांना हुसकावण्याचा प्रयत्न केला जात असला तरी त्याचा फारसा परिणाम होत नसल्याचे शेतकरी सांगत आहेत.

स्थानिक शेतकऱ्यांनी अनेक वेळा वन विभाग आणि संबंधित प्रशासनाकडे या समस्येबाबत तक्रारी केल्याचा दावा केला आहे. मात्र अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. हरणांच्या वाढत्या संख्येमुळे दरवर्षी पिकांचे नुकसान होत असले तरी या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोपही काही शेतकऱ्यांनी केला.

शेतकऱ्यांनी वन विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून नुकसानग्रस्त शेतांचे पंचनामे करावेत, पिकांच्या नुकसानीची भरपाई तातडीने द्यावी तसेच वन्य प्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी कुंपण, सौर संरक्षण व्यवस्था किंवा इतर प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे.

शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असताना एकीकडे दुष्काळसदृश परिस्थिती आणि दुसरीकडे वन्य प्राण्यांचा वाढता उपद्रव यामुळे शेतकरी दुहेरी संकटाचा सामना करत आहेत. या समस्येकडे वन विभाग, कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने संयुक्तपणे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची भावना विरेगाव परिसरातील शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची तातडीने पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत, हरणांच्या उपद्रवावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबवावी आणि शेतकऱ्यांना योग्य आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### जालना महानगरपालिकेचे...

आणि मनमिळावू होता. ते सेवानिवृत्त होत असल्याचे दुःख आहे. त्यांनी अजून काही वर्षे सेवा करायला हवी होती,'' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

नगरसेवक भास्कर दानवे यांनीही आपल्या भाषणात बंडू चव्हाण यांच्या कार्याचे कौतुक करत, ''ते सेवानिवृत्त झाले असले तरी त्यांना भारतीय जनता पक्षात प्रवेश देऊन भविष्यात नगरसेवक करण्याची जबाबदारी माझी असेल,'' असे आश्वासन सभागृहात दिले. नगरसेवक महावीर ढाक्का यांनी सांगितले की, ''प्रभाग क्रमांक ९ मध्ये दोन्ही नगरसेवकांमध्ये मतभेद झाले तरी बंडू चव्हाण यांनी नेहमी समन्वय साधून मनोमिलन घडवून आणले. त्यांनी कधीही कोणाचे मन दुखावले नाही. त्यांचा समंजस स्वभाव सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.''

या निरोप समारंभाला स्थायी समितीचे सभापती अशोक पांगाकर, नगरसेवक भास्कर दानवे, अक्षय गोरंट्याल, स्वच्छता सभापती कपिल भुरेवाल, नगरसेवक महावीर ढाक्का, कल्याण भदनेकर, नगरसचिव केशव कानपुडे तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बंडू चव्हाण यांना उपस्थितांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### व्यसनमुक्त भारतासाठी...

चिमणकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मिनल ठोसर, भागवत शिंदे प्रशासकीय अधिकारी डी.जे.पी, डॉ. विठ्ठल कुचके प्राचार्य ओजस कॉलेज फार्मसी, डॉ.कृष्ण कुमार सिंग प्राचार्य ओजस कॉलेज फिजीयोथेरीपी, डॉ.के.जे.रमीता प्राचार्य ओजस कॉलेज ऑफ नर्सींग, डॉ.संगीता गायकवाड बी.एड. कॉलेज डी.जे.पी, विनीत म्हणुन मयुरकुमार गोरमे जिल्हा युवा अधिकारी माय भारत, डॉ.मुकुंद बंडले उप.प्रा डॉ.वे.पा.आ.वै.महा. व पुरुषोत्तम राखुंडे प्रा. ओजस कॉलेज फार्मसी उपस्थिती होते.

प्रास्ताविकात डॉ. मिनल ठोसर यांनी नशामुक्त भारत अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले. सहायक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजु यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला. तसेच गणेश चिमणकर यांनी सर्व उपस्थितांना नशामुक्तीची शपथ दिली. स्पर्धांचे परीक्षण डॉ.बी.जी.श्रीरामे, डॉ.शिवानंद मुंढे, डॉ.मोनिश शिंदे, श्रीमती कांचन वाघ, व्ही.आर.ठोंबरे, डॉ.अभिषेक शुक्ला, डॉ. रेणुका भावसार बडवणे, डॉ.सुजाता देवरे, शशिकांत वडले, मिलींद सावंत, डॉ. दिपक बुक्तरे, डॉ. अस्मिता शिंदे, डॉ.निशिकांत लोखंडे, विनोद जैतमहल, डॉ. अभिजीत जोशी, सतिष लिंगडे, लक्ष्मीकांत पोलास, डॉ. निधी शर्मा, परमेश्वर क्षिरसागर, गणेश नागवे, डॉ. गंगाधर धांडगे, बिस्मील्ला सय्यद, प्रशंसा घोरपडे यांनी केले. स्पर्धेतील विजेत्यांमध्ये मौखिक कविता स्पर्धेत नम्रता पवार, प्रांजल तस व ऋतुजा गरजे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. घोषवाक्य स्पर्धेत साक्षी राजेंद्र ठाकूर, स्नेहा श्याम खरात व नेहा संजय जोगदंड, रिल स्पर्धेत शिवराज टेकाळे, जयदीप शिंदे व प्रगती बोरुडे, लोकगीत स्पर्धेत पियुष पाटील व टीम, साईनाथ पवार व अर्जुन उबाळे, चित्रकला स्पर्धेत अनुश्री कदम, स्वराली लाडे व कल्याणी पाटील, तर पथनाट्य स्पर्धेत पल्लवी व टीम, श्रावणी व टीम आणि कैफ खान यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड तसेच महाविद्यालयाचे अजित लाटे, अंकित कड, फैजान शेख, अफान हाश्मी, महेश देशमुख, प्रणव खेडकर व महाविद्यालयातील कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### पाऊस पडला... प्रशासन...

कोणाला जबाबदार धरण्यात येणार? याबाबत प्रशासन मौन बाळगणार की ठोस कारवाई करणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

पाहणी दौरे, बैठका आणि सूचना यापलीकडे जाऊन शहरासाठी कायमस्वरूपी जलनिस्सारण आराखडा तयार करणे, अतिक्रमणामुळे अडथळा निर्माण झालेल्या नाल्यांवर कारवाई करणे, दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि पावसापूर्वी सर्व कामे पूर्ण करणे हीच काळाची गरज आहे.

आता सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, पुढील मुसळधार पावसात पुन्हा शहर जलमय झाले तर त्याची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी कोण स्वीकारणार? पाणी तुंबणाऱ्या भागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार, की पुन्हा एकदा पाहणी दौरे, आश्वासने आणि बैठकींचाच सिलसिला सुरू राहणार?

जालनाकरांना आता घोषणांपेक्षा कृती हवी आहे. कारण पावसाचे पाणी काही तासांत ओसरते; पण प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांच्या मनात साचलेला रोष मात्र दिवसेंदिवस वाढत आहे.

### पूरस्थितीवर कायमस्वरूपी...

पाहणी दौऱ्यात नगरसेवक श्री. अजित मानधनी, श्री. जीवन सले, श्री. कल्याण भदनेकर, महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कर्जतजामखेडसाठी अतिरिक्त...

होती. मात्र, आ. रोहित पवार यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून ती स्थगिती उठविण्यातही महत्त्वाची भूमिका बजावली.

या कार्यक्रमास कर्जत तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संग्राम ढेरे, ज्येष्ठ विधीज्ञ बाळासाहेब शिंदे, ॲड. शेळके, ॲड. कदम, उपाध्यक्ष ॲड. चव्हाण, सचिव ॲड. मते, ॲड. राणे, ॲड. गायकवाड, ॲड. जगताप, ॲड. भोसले, ॲड. नेवसे, ॲड. खरात यांच्यासह वकील संघाचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नांदखेडा, किन्ही...

तालुका सरचिटणीस, दिलीपराव सवडे, विलास सवडे, सतीश सवडे, दीपक माळी, संतोष खरात, दीपक माळी, संतोष जंजाळ, ज्ञानेश्वर पवार, रतन पवार, अशोक सवडे, गजानन पवार ज्ञानेश्वर सवडे, कल्याण सवडे,यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती आमदार संतोष पाटील दानवे, तहसीलदार, जाफ्राबाद तसेच उपकार्यकारी अभियंता, टेंभुर्णी यांनाही देण्यात आल्या आहेत.

### गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु...

पूजन करून त्यांचा सन्मान करण्यात आला.यानंतर सौ.राजश्री नाकाडे यांनी ध्यान घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.बालकुमार चाटला तर उपस्थितांन सोबत आयोजनासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे श्री.श्याम जोशी यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.पूजा सचिनआर्य ,सौ.उमा आर्दड,सौ. अश्विनी आर्य,श्री.शरद खोत,शिल्पा शेलगावकर व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास भाविक, साधक व नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

### व्यसनमुक्त भारतासाठी...

स्पर्धेत पल्लवी व टीम, श्रावणी व टीम आणि कैफ खान यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेतील विजेत्यांना अप्पर पोलीस अधीक्षक विक्रांत साळी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमाचा समारोप जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांनी केला. सूत्रसंचालन धरतीधन ग्रामविकास संस्थेचे अध्यक्ष मिलिंद सावंत आणि सहारा सामाजिक विकास संस्थेचे अध्यक्ष बी. एस. सय्यद यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी युवा बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड तसेच महाविद्यालयाचे अजित लाटे, अंकित कड, फैजान शेख, अफान हाश्मी, महेश देशमुख, प्रणव खेडकर व महाविद्यालयातील कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### लोकशाहीर अण्णाभाऊ...

आले. डोमेगावातील हा उपक्रम ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरत असून सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरण संवर्धनाचा आदर्श निर्माण करणारा ठरला आहे.

भरपावसात पावनखिंडीत इतिहासाचा जागर;

# हिंदु जनजागृती समितीतर्फे ‘पावनखिंड मोहीम’ उत्साहात
## नरवीर बाजीप्रभू देशपांडे व नरवीर शिवा काशीद यांच्या वंशजांची उपस्थिती

पावनखिंड (जि. कोल्हापूर) : हिंदु जनजागृती समितीच्या वतीने तिथीनुसार नरवीर बाजीप्रभू देशपांडे आणि फुलाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदानदिनानिमित्त ३० जुलै रोजी ‘पावनखिंड मोहिमे’चे आयोजन करण्यात आले होते. भरपावसात पार पडलेल्या या मोहिमेमुळे उपस्थितांमध्ये नवचेतना जागृत झाली. पन्हाळा येथे नरवीर शिवा काशीद यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. हिंदु राष्ट्र स्थापनेची शपथ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या मोहिमेला नरवीर बाजीप्रभूंचे वंशज श्री. संदेश देशपांडे व नीलेश देशपांडे, सरदार कमळोजी साळुंखे यांचे वंशज श्री. सुहासदादा साळुंखे आणि नरवीर शिवा काशीद यांचे वंशज श्री. आनंदराव काशीद यांची विशेष उपस्थिती होती. ‘आई वाघजाई देवी शक्ती दे, विशाळगडाला मुक्ती दे’, ‘नरवीर बाजीप्रभू देशपांडे आणि नरवीर शिवा काशीद यांचा विजय असो’, ‘नमोः पार्वतीपते हर हर महादेव’ आदी घोषणांनी पावनखिंड परिसर क्षात्रतेजाने दुमदुमून गेला.

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ता श्री. रमेश शिंदे म्हणाले, ‘‘छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यात पूर्णतः स्वदेशी तंत्र विकसित केले होते. आज स्वातंत्र्यानंतरही आपण आपले ‘स्व’राज्य निर्माण करू शकलो नाही. शिवछत्रपतींचे स्वराज्य ‘अटक ते जिंजी’ सुमारे १५०० किमी विस्तारले होते. बाजीप्रभू देशपांडे, शिवा काशीद, फुलाजीप्रभू यांसारख्या मावळ्यांचा आदर्श ठेवून हिंदु राष्ट्रासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचा संकल्प करा.’’सनातन संस्थेच्या धर्मप्रसारक सद्गुरु स्वाती खाडये म्हणाल्या, ‘‘छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांनी संघर्षातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले. हिंदु राष्ट्रही संघर्षाशिवाय मिळणे अशक्य आहे. रामराज्य स्थापनेसाठी प्रत्येकाने प्रतिदिन ‘श्रीराम जय राम जय जय राम’ नामजप करावा.’’ नरवीर शिवा काशीद यांचे वंशज श्री. आनंदराव काशीद म्हणाले, ‘‘पावनखिंडीत असंख्य मावळ्यांचे बलिदान झाले आहे. त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन इतिहास केवळ स्मरणात न ठेवता तो आपल्या आचरणातून जगला पाहिजे.’’ विशेष आकर्षण व सत्कार : या प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यातील सरदार कमळोजी साळुंखे यांनी वापरलेली ऐतिहासिक तलवार आणि शिवकालीन पट्टा उपस्थितांना दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. तसेच १०७ वेळा रक्तदान करणारे ‘मराठा तितुका मेळवावा’चे श्री. अनिश पोतदार यांचा श्री. रमेश शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मलकापूरच्या नगराध्यक्षा सौ. रश्मी कोठावळे, नगरसेवक महेश कोठावळे, सरपंच चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महेश विभूते, हिंदु महासभेचे उपाध्यक्ष विकास जाधव, डॉ. अश्विनी माळकर, सौ. मनीषा वाडीकर, योगेश केरकर, अशोक गुरव, प्रसाद कुलकर्णी, डॉ. मानसिंग शिंदे, डॉ. शिल्पा कोठावळे आणि हिंदु जनजागृती समितीचे श्री. शिवानंद स्वामी यांसह अनेक शिवप्रेमी उपस्थित होते.

## समाज गौरव पुरस्काराने कृष्णा सोनवणे यांना सन्मानित



**परतूर -प्रतिनिधी**

तेली सेना छत्रपती संभाजीनगर आमचा मान आमचा अभिमान समाज गौरव पुरस्कार २०२६ महसूल सेवक कृष्णा विठ्ठलराव सोनवणे यांना तेली सेना च्या वतीने २६ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. कृष्णा विठ्ठलराव सोनवणे यांना शाल श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तेली सेना संस्थापक अध्यक्ष गणेश पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी साई वाल्मीकराव शेलार, योगेश मिसाळ, लंका सोनवणे, डॉ. सुनिता पवार, अशोक लोखंडे, सुनील क्षीरसागर, जगदीश नंदकर, श्रीराम कोरडे, दत्ता भोलाणे, याबद्दल सोनवणे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# थोरले बाजीराव पेशवे जयंतीनिमित्त राज्यभर कार्यक्रम पराक्रम दिना निमित्त राज्यस्तरीय निबंध, वक्तृत्व व रिल्स स्पर्धांचे आयोजन!

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या वतीने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १८ ऑगस्ट हा दिवस राज्यभरात पराक्रम दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व राष्ट्रनिष्ठेचा परिचय नवीन पिढीला व्हावा, या उद्देशाने राज्यभरात १ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पराक्रम दिन साजरा करण्यासंदर्भात अमृत संस्थेमार्फत पराक्रम दिन समिती स्थापन करण्यात आलेली असून त्या समितीमध्ये काकासाहेब विधाते, पांडुरंग बलकवडे, जगन्नाथ लडकत, मोहन शेटे, मंगेश खाडिलकर, सौ. कौमुदी परांजपे या दिग्गज इतिहास तज्ञ आणि अभ्यासक यांचा समावेश आहे.

या पराक्रम दिन निमित्ताने शाळा, महाविद्यालये व खुल्या गटातील नागरिकांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जात असून जास्तीत जास्त नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

स्पर्धेचे स्वरूप, विषय, बक्षीसे आणि अधिकृत नियमावली पराक्रम दिनच्या अधिकृत संकेतस्थळावर सहभाग कसा नोंदवाल? (://.../) उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संदर्भ पुस्तके आणि ई बुक : श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्याशी संबंधित शेकडो पुस्तके उपलब्ध आहेत. तथापि या स्पर्धांसाठी निवडण्यात आलेल्या विषयांसाठी निवडक संदर्भ पुस्तके ‘‘पराक्रम दिन समिती निश्चित केलेली आहेत. त्यांची यादी वरील संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे थोरले बाजीराव पेशवे यांचा जीवन प्रवास अतिशय सोपा आणि संक्षिप्त पद्धतीने ई बुक स्वरूपात या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे आणि या ई बुक च्या आधारावरच प्रश्नावली देखील तयार करण्यात आलेले आहेत. सर्व शाळा व महाविद्यालयांनी तसेच सर्व इच्छुकांनी या उपक्रमात उत्साहाने सहभागी होण्याचे आवाहन अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

ग्राहकांच्या समस्यांची सोडवून ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा मिळाव्यात, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि ग्राहक संरक्षण अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात संपन्न झाली. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी (अ.का.) शशिकांत हदगल, वैधमापनशास्त्र उपनियंत्रक, आर.डी. दराडे, जि.अ.कृ.अ. संजय कायंदे, पोलीस उपअधिक्षक सचिन इंगोले, महावितरणचे अभियंता धनाजी जाधव, अन्न व औषध प्रशासन सहा.आयुक्त जी.द.जाधव, अनुजा नगरारे, अश्वीनी तांबे, आरोग्य विभागाचे डॉ.नारायण पवार, मोटार वाहन निरिक्षक कल्पेश सुर्यवंशी यांची उपस्थिती होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले की, ग्राहकांना दर्जेदार वस्तू व सेवा मिळाव्यात, ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि ग्राहक संरक्षण अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे. तसेच जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारी त्वरित सोडविण्याचे आहे. जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेमार्फत नागरिकांना दैनंदिन व्यवहारात येणाऱ्या अडचणीबाबत उपाय योजना करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ग्राहकांना काही अडचणी असल्यास त्याबाबत जालना जिल्ह्याचे संकेतस्थळ .. यावर ग्राहकांच्या तक्रारीसाठी पोर्टल उपलब्ध करुन दिलेले असून, नागरिकांनी त्यांच्या समस्या या पोर्टलच्या माध्यमातून सादर करावे. बैठकीत यावेळी अशासकीय सदस्यांनी बैठकीमध्ये विविध विषयाच्या ग्राहकांशी निगडीत तक्रारी मांडल्या, यामध्ये जिल्ह्यातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाने आयुष्मान कार्डचे वितरण व लाभ नियमानुसार वितरीत करावे. तसेच अनधिकृत वैद्यकीय व्यावसाय (बोगस डॉक्टर) करणाऱ्यावर कारवाई करावी. तसेच अन्न औषध प्रशासनाने भेसळयुक्त खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करावी. शहरातील विविध भागात अनाधिकृत केबल किंवा इंटरनेटच्या केबलमुळे नागरिकांना त्रास होत असुन, ही केबल काढण्यात यावेत. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने रिक्षाचालक मनमानी भाडे आकारत आहे, त्यांच्यावर कारवाई करावी. तसेच शालेय बस व व्हॅनची तपासणी करावी. महावितरणने नागरिकांची परवानगी घेवूनच स्मार्ट मिटर बसवावे. बैठकीत सिटी सर्व्हे कार्यालयाच्या कामकाजाबाबत गंभीर तक्रार मांडण्यात आली. काही प्रकरणांमध्ये संबंधित बँकेला कोणतीही पूर्वसूचना अथवा माहिती न देता मालमत्तेवरील बँकेचा बोजा कमी किंवा वगळला जात असल्याचे मुद्दे उपस्थित केले.

आजच्या बैठकीत अशासकीय सदस्यांनी मांडलेल्या तक्रारींची दखल घेवून, याबाबत योग्य कार्यवाही करुन, अहवाल सादर करण्याच्या सूचना यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी यावेळी दिल्या.

यावेळी बैठकीत विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी उपस्थित विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजना व उपक्रमांची माहिती दिली. यामध्ये आरोग्य विभागाच्यावतीने मुलींना गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून ( ) संरक्षण देणारी सुरक्षित व प्रभावी लस उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली. पालकांनी पात्र मुलींचे लसीकरण करून घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले. तसेच वैध मापन शास्त्र विभागाच्या वतीने महाराष्ट्रात परवाना नूतनीकरण, वजन-माप उपकरणांची पडताळणी व मुद्रांकन यासह विविध सेवा ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

अन्न व औषध प्रशासन विभागाने ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने दूधापासून तयार केलेले पनीर आणि ॲनालॉग पनीर यातील फरक स्पष्ट केला. हॉटेल व रेस्टॉरंट चालकांनी ग्राहकांना कोणत्या प्रकारचे पनीर दिले जात आहे, याची माहिती मेनूमध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

तसेच औषधांची एक्सपायरी डेट, निकृष्ट दर्जाची औषधे किंवा कफ सिरपसारख्या उत्पादनांबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविण्यासाठी विभागाकडून सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती दिली. प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत सारथी पोर्टल, वाहन पोर्टल व ई-चलान प्रणालीद्वारे विविध ऑनलाइन सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती देण्यात आली. महावितरण विभागाने स्मार्ट व प्रधानमंत्री सूर्यघर योजनेंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प, तसेच शेतकऱ्यांसाठी सौर कृषी पंप योजनेची माहिती दिली. कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी विकसित केलेल्या महाविस्तार मोबाईल ॲप विषयी माहिती दिली. या ॲपद्वारे हवामान, कृषी सल्ला, बाजारभाव व विविध कृषी योजनांची माहिती उपलब्ध होत असल्याचे सांगितले. तसेच महाडीबीटी पोर्टलद्वारे कृषी विभागाच्या विविध अनुदानित योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करता येत असल्याची माहिती देण्यात आली.

तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजना () अंतर्गत सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन दिले जात असुन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. बैठकीच्या सुरुवातीस जिल्हा पुरवठा कार्यालयाचे श्री. डोईफोडे यांनी प्रास्ताविकात जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे उद्दीष्ट सांगुन मागील बैठकीबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच .. या संकेतस्थळावर ग्राहकांच्या समस्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. ग्राहकांच्या हिताशी संबंधित तक्रारी असल्यास त्या ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन केले.

# निखळ आनंदाच नातं– मैत्रीचं !

आयुष्याचे सर्वात सुंदर नाते मैत्रीचे. ‘‘मित्र‘‘ हा शब्द उच्चारताच डोळ्यांसमोर उभी राहते ती हक्काची माणसे, ज्यांच्यासमोर आपल्याला मुखवटा घालण्याची गरज नसते. रक्ताची नाती आपल्याला जन्माने मिळतात, पण मैत्री हे एकमेव असे नाते आहे जे आपण स्वतःच्या आवडीने निवडतो आणि आयुष्यभर जपतो.मैत्री म्हणजे नक्की काय? मैत्री म्हणजे रोज भेटणे किंवा तासनतास बोलणे नव्हे. मैत्री म्हणजे एकमेकांच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभे राहणे. जेव्हा संपूर्ण जग आपल्या विरोधात असते, तेव्हा ‘‘काळजी करू नको, मी आहे ना तुझ्यासोबत!‘‘ हा विश्वास देणारा शब्द म्हणजे मैत्री. मित्रांसोबत घालवलेला प्रत्येक क्षण हा आठवणींचा एक मौल्यवान ठेवा बनतो. शाळेच्या बाकावर एकत्र खाल्लेला डबा असो किंवा कॉलेजमधील कट्ट्यावरची चहा, या साऱ्या आठवणी मनाच्या एका कोपऱ्यात नेहमी जिवंत असतात..

ज्याच्या जवळ मनातील भाव व्यक्त करतांना लज्जा संकोच वाटत नाही, खोटे बोलावेसे वाटत नाही, फसवावेसे वाटत नाही पाप-पुण्याची कबुली देण्यास मनकचरत नाही, ज्याला आपला पराक्रम कौतुकाने सांगावासं वाटतो, ज्याच्याजवळ पराभवाचे शल्य उघडे करायला कमीपणा वाटत नाही, ज्याच्या सुखदुःखाशी आपण एकरूप होऊ शकतो तो खरा मित्र आणि ती खरी मैत्री.

बंधना पलीकडले हे एक नाते असते. शब्दाचे त्याला बंधन नसते. दुःखाला तिथे थारा नसतो आणि गोडवा मैत्रीत असतो.

भारतात ऑगस्टमध्ये येणाऱ्या पहिल्या रविवारी मैत्री दिवस साजरा केला जातो.

‘‘फ्रेंडशिप डे‘‘ अर्थातच मैत्री दिवस. हा संपूर्ण जगात उत्साहात साजरा केला जातो, कारण असा एखादाच कोणी माणूस असेल ज्याला मित्र नाही, आणि ज्याला मैत्रीचे महत्त्व ही माहीत नाही. आपल्या सर्वांच्या आयुष्यात कमी - अधिक प्रमाणात मित्र असतात, मित्रांसमवेत घालवलेला वेळ कोणास आवडणार नाही. विशेषतः बालपणातील मैत्री खूप घट्ट असते. ज्याची आठवण कायमची मनात राहते. मैत्रीच्या नात्यात जात धर्म वगैरेला महत्त्व नसते आणि त्याचा अडथळा नसतो त्या नात्याला एक खास महत्त्व आहे.

मैत्री एक असं नातं आहे ज्याला एखादी व्यक्ती स्वतःच्या इच्छेनुसार निवडतो. बालपणात नकळत बरेच मित्र बनून जातात. ज्यामध्ये काही मित्र असेही असतात जे शाळेपासून ते कॉलेजपर्यंत साथ देतात तर काही चांगल्या आणि वाईट काळात देखील आपली मैत्री निभावतात. तथापि असे मित्र फारच कमी असतात जे आयुष्यभर आपली मैत्री जपतात. म्हणून मैत्री करताना आपण सावध असायला हवे. आपण सहजच म्हणत असतो -‘‘समान गुणे व्यसनेशुच् सख्यम‘‘

मित्र असे असतात ज्यांचा सहवास आपल्या वर्तमान आणि भविष्यावर प्रभाव टाकत असतात . वाईट सवय असलेल्या मित्रांचा सहवास आपल्याला आणि आपल्या भविष्याला खराब करतात, तर चांगली विचारसरणी आणि चांगल्या सवयी असलेले मित्र आपल्या व्यक्तिमत्त्वाला आणि आपल्या जीवनाला सुशोभित करण्यास मदत करतात.

आजकाल मित्रांना अनेक वर्गात विभागले आहेत जसं की एक सारखा छंद जोपासणारे मित्र, व्यवसायी मित्र, कामाच्या ठिकाणचे मित्र, इत्यादी पण जे खरे मित्र असतात त्यांची आवड निवड एक सारखी असते. ते आपल्याला आयुष्याचा पदोपदी साथ देतात ते नेहमीच आपल्या चांगल्याचा विचार करतात. आपल्या आयुष्यात देखील असा कोणी खरामित्र असेल तर त्याला मैत्री दिनाच्या या खास प्रसंगी आपल्या त्या खास मित्राला तो खास असल्याची जाणीव नक्कीच करून देत असतो. हा दिवस आपल्या जिवलग मित्रांसह साजरा केले जातो. बरेच लोकं हा दिवसआपल्या मित्रांसह साजरा करण्यासाठी विविध योजना आखून हा दिवस साजरा करतात. संपूर्ण दिवस जरी नाही तरी जेवढे शक्य असल्यास आपल्या व्यस्ततेमधून काही क्षण आपल्या मित्रांसाठी नक्की काढतो,वा काढावे.

या दिवशी मैत्रीचे निरनिराळ्या प्रकारचे आकर्षक धागे,शुभेच्छापत्र,आता काही वर्षांपासून वॉट्साप वर शुभेच्छा संदेश, फेसबुकवर संदेश दिले जातात. एकत्रित भोजनाचे बेत आखले जातात.

एकमेकां पासून दुर असतील तर फोन वरुन बोलून जवळीक साधली जाते.

अमेरिकेत सरकारने एका माणसाला ठार मारले. त्याचा एक मित्र होता,त्याला मित्राचे मरणाचे




दुःख झाल्याने जीवन संपवले.त्याच्या स्मरणार्थ हा दिवस १९३५ पासून मित्रता दिवस ‘‘फ्रेन्डशिप डे‘‘ साजरा होऊ लागला.

मैत्री कशी असते ह्या विषयीच्या दोन गोष्टी बघा, घट्ट मैत्री कशी असते....

जेव्हा छ.शिवाजी महाराजांनी किल्ले हाती घेण्याची मोहीम चालवली तेव्हा प्रत्येकवेळी तानाजी आघाडीवर होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यात अनेक शूरवीर असतानाही जेव्हा कोंडाणा जिंकून आणण्याची वेळ आली तर महाराजांच्या मनात एकच नाव होते ते म्हणजे तानाजी मालुसरे. इतिहासातील हे युद्ध सिंहगडची लढाई म्हणून नोंदवले गेले आहे. तेव्हा ते कोंडाणा म्हणून ओळखले जात होते. शिवाजी महाराजांचे परममित्र तानाजी मालसुरे आपल्या मुलाच्या लग्नाच्या तयारीत व्यस्त असताना हे सर्व घडले होते. कोंडाणा किल्ल्यासह २३ किल्ले पुरंदर करारामध्ये मुघलांना सोपविल्यानंतरही मोगल सल्तनत तहान भागली नव्हती. औरंगजेबाने आपला विश्वासू उदयभानु राठोड यांना कोंडाणा किल्ल्याकडे पाठवून मराठा साम्राज्य नष्ट करण्याचा नेम धरला होता. तेव्हा शिवाजी महाराजांना आपल्या शूर व प्रिय मित्राला युद्धाच्या घटनेत सामील करायचे नव्हते, कारण तानाजीच्या घरी लग्नाची तयारी सुरु होती. पण स्वराज्य आणि शिवाजी महाराजावर संकट आल्याचे कळले तर तानाजींनी मुलगा रायबाच्या लग्नाची पर्वा न करता भगवा परिधान केला. अत्यंत कठीण प्रसंगी राज्यासाठी कामास येण्यापेक्षा मोठे भाग्य काय असावे असा विचाराने तानाजींची छाती गर्वाने फुलून गेली.आधी लग्न उरकून घेऊ, मग कामगिरीसाठी निघू असे शेलार मामांनी म्हटल्यावर तानाजींनी उत्तर दिले की ‘‘आधी लगीन कोंढाण्याचे मग लगीन रायबाचे‘‘. तानाजी जिजाऊंना भेटून रायबाची जबाबदारी शिवाजी महाराजांच्या हाती देऊन म्हणाले की कोंढाण्याहून परतलो तर मी मुलाचे लग्न लावेन आणि जर मेलो तर तुम्ही त्याचे लग्न लावून द्या. ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजी मालुसरे यांच्या नेतृत्वाखाली राजगडावरुन मराठा सैन्य निघाले. आपले प्राण पणाला लावून कोंडाणा ताब्यात घेतला. महाराजांना विजयाची बातमी कळताच आनंद झाला पण तानाजींनी प्राण गमावले कळताच त्यांचे अश्रु अनावर झाले आणि त्यांच्या तोंडून उद्गार निघाले- गड आला पण सिंह गेला...

मित्र म्हणजे असा घागा,
मोकळं व्हावं अशी जागा,
कोणतच नाटक नाही....

प्रत्येकाच्या आयुष्यात असे मित्र मैत्रिणी असतातच.. तर असाच एक मित्र म्हणा, मैत्रीण म्हणा आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आहे! कोण बरं?? तर ते म्हणजे पुस्तक! पुस्तकाशी मैत्री. ही पुस्तके लहानपणापासून तर शेवट पर्यंत बाल साहित्यापासून तर भगवद् गीतेपर्यंत साथ देणारी ही जिवाभावाचे मित्र- मैत्रीण! आपल्या एकटेपणात आपला साथ देणारी...अजून...

मैत्री हा शब्द आठवताच प्रथम डोळ्यांसमोर उभी राहते ती कृष्ण-सुदामा यांची मैत्री. महाभारताच्या काळातली ही मैत्री. पण भारताच्या इतिहासात ती अमर होऊन बसली. कृष्ण श्रीमंत होता; तर सुदामा गरीब होता. कृष्ण देखणा, बलवान; तर सुदामा हडकुळा, खंगलेला आणि रूपाने सामान्य. पण दोघांची घनदाट मैत्री झाली. सांदिपनी ऋषींच्या आश्रमात गुरुगृही दोघेही शिक्षण घ्यावयास आले. त्या आश्रमात त्यांची इतकी मैत्री झाली की, एकमेकांशिवाय एकमेकांना चैन पडायचे नाही. कृष्ण मनानं इतका मोठा, इतका उदार की त्याने आपला मित्र एक दरिदी भिक्षुक ब्राह्मण आहे याचा कधी विचारही केला नाही.

आश्रमातले दिवस संपले. पुढे श्रीकृष्ण द्वारकेचा राजा झाला. सुदाम्याच्या कानी त्याची किर्ती साहजिकच पडली. त्याला कृष्णाला भेटायची, बघायची इच्छा झाली. तो द्वारकेला आला. राजवाड्याच्या दाराशी भीत भीत उभा राहिला. पहारेकरी ओरडले. त्याला आत जाऊ देईनात. कृष्णाने विचारले कोण आहे रे तिकडे? सुदामा थरथर कापत म्हणाला, मी सुदामा... सुदामा हे नाव कानी पडताच कृष्ण धावत आला आणि त्याने सुदाम्याला कडकडून मिठी मारली. प्रेमाने आत नेऊन आपल्या सिंहासनाशेजारी बसवले आणि विचारले, काय भेट आणलीस माझ्यासाठी? सुदाम्याने लाजत लाजत अंगावरला पंचा पुढे केला. त्यात पोह्यांची पुरचुंडी होती. कृष्णाला आवडणारे पोहे सुदाम्याने आठवणीने त्याच्यासाठी आणले होते. कृष्णाने अधाश्यासारखे ते पोहे खाल्लेत. त्याच्या हृदयात गहिवर दाटून आला. डोळ्यात पाणी उभे राहिले.

म्हणाला, सुदामा, किती रे तुझे माझ्यावर प्रेम. अरे, मला पोहे आवडतात हे लक्षात ठेवून तू प्रेमाने मला पोह्यांची भेट दिलीस!

कृष्ण-सुदाम्याच्या मैत्रीची ही कथा! पण तिचे नुसते स्मरण झाले तरी डोळ्यात पाणी येते. दोन व्यक्तीं मध्ये मैत्रीची भावना केवढी महान असू शकते हे ही कथा सिद्ध करते. खरोखर, मैत्री किती श्रेष्ठ आहे. एकमेकांच्या प्रगतीची आणि समृद्धीसाठी एकमेकासाठी प्रयत्न असणे तसेच आनंद असणे हीच मैत्री आहे. प्रत्येक माणसाला मित्र हा हवाच ! पुरुषाला मित्र आणि स्त्रीला मैत्रीण म्हणजे एक आधार असतो. सुप्रसिद्ध लेखिका विभावरी शिरुरकरांनी एके ठिकाणी असे लिहिले आहे की शंभर मैत्रिणींपेक्षा स्त्रीला एक पुरुष मित्र अधिक आवडतो !

असा मैत्रीचा धागा जपू या....

सर्वांना मैत्री दिवसाच्या शुभेच्छा !

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**

# पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजनांसाठी प्रशासनाला सूचना - भास्कर दानवे

## जालना शहरातील पावसामुळे बाधित भागाची पाहणी

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहरात दि. ३० जुलै पासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रभाग क्र. १ मधील गायत्री नगर, कोठारी नगर व महेश नगर परिसरात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी शिरून अनेक नागरिकांच्या घरांचे नुकसान झाले. या घटनेची तात्काळ दखल घेत जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी महापौर श्रीमती वंदनाताई मगरे, उपमहापौर श्री. राजेश राऊत आणि महानगरपालिका आयुक्त श्रीमती



अंजली शर्मा यांच्या सह बाधित भागाची प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी त्यांनी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच प्रशासनाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. नवीन मोंढ्याकडून येणारे पावसाचे पाणी मुख्य रस्त्यालगतच्या ड्रेनेज लाईनमध्ये वळवून ते सीना नदीपर्यंत सोडण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करण्याच्या सुचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. भविष्यात गायत्री नगर, कोठारी नगर, महेश नगर व परिसरातील नागरिकांना पूरस्थिती तसेच घरांमध्ये पाणी शिरण्याच्या समस्येपासून कायमस्वरूपी दिलासा मिळावा, यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी भास्कर आबा दानवे यांनी सांगण्यात आले.या (पान २ वर)

## तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेअंतर्गत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना कार्यालयामार्फत ''तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजना'' अंतर्गत जिल्ह्यातील तृतीयपंथीय व्यक्तींसाठी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

तृतीयपंथीयांची कार्यशाळा दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे आयोजित करण्यात आली आहे.

कार्यशाळेमध्ये तृतीयपंथीय व्यक्तींचे हक्क, शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, सामाजिक सुरक्षा, ओळखपत्रे, कायदेशीर संरक्षण तसेच शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच उपस्थित तृतीयपंथीयांच्या समस्या व अडचणी जाणून घेऊन त्यावर आवश्यक मार्गदर्शन व उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व तृतीयपंथीय व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांनी या कार्यशाळेस उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे

## केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह दौरा कार्यक्रम

**जालना - प्रतिनिधी**

केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असुन, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे असणार आहे.

केंद्रीय मंत्री गिरिराज सिंह हे दि. ०१ ऑगस्ट, २०२६ रोजी दूपारी ४.१५ वाजता महिको प्रा.लि. सीड रिसर्च कंपनी, जालना येथे आगमन. तर सायं. ५.१५ वाजता महिको प्रा. लि. बीज संशोधन केंद्र भेट देतील. सायं. ५.४५ वाजता कापूस प्रक्षेत्रास भेट देतील. सोयीने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## कर्जतजामखेडसाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाला मंजुरी; पाठपुराव्याबद्दल आ. रोहित पवार यांचा वकील संघाकडून सत्कार

**कर्जत जामखेड -प्रतिनिधी**

कर्जत-जामखेड या दोन्ही तालुक्यांसाठी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी लोकप्रतिनिधी म्हणून सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार रोहित पवार यांचा कर्जत तालुका वकील संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्काराचा नम्र स्वीकार करताना आ. रोहित पवार यांनी, *''पक्षकार आणि वकिलांना ज्या-ज्या वेळी गरज भासेल, त्या प्रत्येक वेळी न्यायव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी आणि



न्यायाच्या या कार्यात संपूर्ण सहकार्य करण्यासाठी आपण कटिबद्ध राहू,'' अशी ग्वाही दिली. यावेळी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाच्या स्थापनेसाठी कर्जत तालुका वकील संघाच्या विद्यमान तसेच माजी पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयापासून विविध स्तरांवर सातत्यपूर्ण प्रयत्न केले. त्यांच्या या योगदानाचे आ. रोहित पवार यांनी विशेष कौतुक करत त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

यापूर्वीही कर्जत येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय मंजूर करून घेण्यासाठी आ. रोहित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात या न्यायालयाला मंजुरी मिळाली होती. त्यानंतर महाविकास आघाडी सरकार सत्तेतून गेल्यानंतर आलेल्या शिंदे सरकारने या न्यायालयाच्या कार्यवाहीला स्थगिती दिली (पान २ वर)

## नांदखेडा, किन्ही, काचनेरा परिसरात दिवसा सिंगल फेज वीजपुरवठ्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**जाफ्राबाद - प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यातील गट ग्रामपंचायत नांदखेडा, किन्ही व काचनेरा परिसरात दिवसा सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच सौ. सूर्यकलाबाई गुलाबराव सबडे यांनी दिला आहे.



याबाबत उपकार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग, जाफ्राबाद यांना निवेदन सादर करण्यात आले. पावसाळ्यामुळे शेतात सर्प व विंचूंचा वावर वाढला असून रात्रीच्या अंधारात शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच परिसरात रात्री उशिरा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने दिवसा सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर उपसरपंच भरत अवचितराव जाधव, ग्रामपंचायत अधिकारी एम. आर. डोईफोडे, बाबासाहेब सवडे, सरपंच शिराळा पांडुरंग दुनगहु, पंढरीनाथ म्हस्के मनसे (पान २ वर)

## गुरुपौर्णिमेनिमित्त गुरु -शिष्य परंपरेचा जागर

**जालना - प्रतिनिधी**

आषाढी पौर्णिमा (गुरुपौर्णिमा) निमित्त देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था, टाऊन हॉल जुना जालना येथे महाराष्ट्र योग शिक्षक संघ,चैतन्य योग केंद्र,पतंजली योग समिती,भारतीय योग संस्थान योगसाधना परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा भक्तिमय व प्रबोधनात्मक कार्यक्रम दि. २९/०७/२०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरुपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री.देवानद चित्राल- छत्रपती योग क्रीडा प्रशिक्षण मंडळ-अंबड तर प्रमुख पाहुणे श्री.नागेश पिंपरकर-चैतन्य योग केंद्र, श्री.



किशन जी डागा-पतंजली योग समिती, सौ.राजश्री नाकाडे-भारतीय योग संस्थान, महाराष्ट्र योग शिक्षण संघाच्या अध्यक्ष सौ. स्वप्नजा तुपकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्वप्नजा तुपकर यांनी केले.

नागेश पिंपरकर यांनी गुरु-शिष्य परंपरेची सुरुवात,गुरु-शिष्य नात्याचे पावित्र्य,गुरुतत्त्वाचे अध्यात्मिक महत्त्व आणि भारतीय संस्कृतीतील गुरुचे सर्वोच्च स्थान याविषयी अत्यंत अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी विवेचन केले. सौ.राजश्री नाकाडे यांनी सांगितले की, सद्गुरूच्या मार्गदर्शनाखालीच ज्ञान, संस्कार, आत्मविकास आणि आत्मसाक्षात्काराचा मार्ग प्रशस्त होतो.

यावेळी गुरुस्थानी सौ.सुलोचना पडघन,सौ.निशा उंबरहंडे,श्री. श्याम जोशी,श्री.शरद खोत,श्री. देवानद चित्राल,सौ. स्वप्नजा तुपकर,श्री.नागेश पिंपरकर,श्री.बालकुमार चाटला यांचे (पान २ वर)

## व्यसनमुक्त भारतासाठी युवकांचा जागर; डि.जे.पी. कॅम्पसमध्ये जिल्हास्तरीय 'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' स्पर्धा उत्साहात संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत, जालना व डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने 'जिल्हास्तरीय नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत' स्पर्धेचे आयोजन डि.जे.पी. कॅम्पस, रेवगाव रोड, जालना येथे उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. स्पर्धेत चित्रकला, घोषवाक्य लेखन, भाषण, लोकनृत्य, लोकगीत, रिल निर्मिती, पथनाट्य आणि मौखिक कविता अशा आठ विविध स्पर्धांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी नशामुक्त भारताचा संदेश प्रभावीपणे सादर करत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व धन्वंतरी प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन सहायक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजु यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून सहायक आयुक्त (कौशल्य विभाग) गणेश चिमणकर व सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. वेदप्रकाश पाटील आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मिनल ठोसर होत्या. भागवत शिंदे प्रशासकीय अधिकारी डी.जे.पी, डॉ. विठ्ठल कुचके प्राचार्य ओजस कॉलेज फार्मसी, डॉ.कृष्ण कुमार सिंग प्राचार्य ओजस कॉलेज फिजीयोथेरीपी, डॉ. के.जे.रमीता प्राचार्य ओजस कॉलेज ऑफ नर्सींग, डॉ.संगीता गायकवाड बी.एड. कॉलेज डी.जे.पी, विनीत म्हणुन मयुरकुमार गोरमे जिल्हा युवा अधिकारी माय भारत, डॉ.मुकुंद बंडले उप.प्रा डॉ.वे.पा.आ.वै.महा. व पुरुषोत्तम राखुंडे प्रा. ओजस कॉलेज फार्मसी उपस्थिती होते.

प्रास्ताविकात डॉ. मिनल ठोसर यांनी नशामुक्त भारत अभियानाचे महत्त्व अधोरेखित केले. सहायक जिल्हाधिकारी डॉ. रंगमंजु यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला. तसेच गणेश चिमणकर यांनी सर्व उपस्थितांना नशामुक्तीची शपथ दिली.

स्पर्धांचे परीक्षण डॉ.बी.जी.श्रीरामे, डॉ.शिवानंद मुंढे, डॉ.मोनिश शिंदे, श्रीमती कांचन वाघ, व्ही.आर.ठोंबरे, डॉ.अभिषेक शुक्ला, डॉ. रेणुका भावसार बडवणे, डॉ.सुजाता देवरे, श्री शशिकांत वडले, मिलींद सावंत, डॉ. दिपक बुक्तरे, डॉ. अस्मिता शिंदे, डॉ. निशिकांत लोखंडे, विनोद जैतमहल, डॉ. अभिजीत जोशी, सतिष लिंगडे, लक्ष्मीकांत पोलास, डॉ. निधी शर्मा, परमेश्वर क्षिरसागर, गणेश नागवे, डॉ. गंगाधर धांडगे, बिस्मील्ला सय्यद, प्रशंसा घोरपडे यांनी केले.

स्पर्धेतीग विजेत्यांमध्ये मौखिक कविता स्पर्धेत नम्रता पवार, प्रांजल तस व ऋतुजा गरजे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. लोकनृत्य स्पर्धेत वैष्णवी ढाकीणकर व टीम प्रथम, तनुजा पवार व टीम द्वितीय तर सारिका नागरे व टीम तृतीय ठरली. भाषण स्पर्धेत साक्षी सुरेश डांगे, श्वेता नवनाथ देशमुख व भूमिका आढाव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. घोषवाक्य स्पर्धेत साक्षी राजेंद्र ठाकूर, स्नेहा श्याम खरात व नेहा संजय जोगदंड, रिल स्पर्धेत शिवराज टेकाळे, जयदीप शिंदे व प्रगती बोरुडे, लोकगीत स्पर्धेत पियुष पाटील व टीम, साईनाथ पवार व अर्जुन उबाळे, चित्रकला स्पर्धेत अनुश्री कदम, स्वराली लाडे व कल्याणी पाटील, तर पथनाट्य (पान २ वर)

## २३ दिवसांच्या बालकाच्या सुंतेत हलगर्जीपणाः के. व्ही. एम. रुग्णालयाला ५० लाखांचा दणका

**जालना - प्रतिनिधी**

केरळमधील मल्लपुरम जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोगाने वैद्यकीय हलगर्जीपणाच्या एका अत्यंत गंभीर प्रकरणात ऐतिहासिक निकाल देत २३ दिवसांच्या चिमुकल्याला ५० लाख रुपयांची भरपाई आणि २५ हजार रुपयांचा खर्च देण्याचे आदेश के. व्ही. एम. रुग्णालय व संबंधित डॉक्टरांना दिले आहेत. १८ एप्रिल २०१८ रोजी अवघ्या २३ दिवसांच्या निषान या बालकाला सुंता शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात नेण्यात आले होते. परंतु, डॉ. आशिक यांनी अस्वच्छ शस्त्रक्रिया गृहात आणि अयोग्य पद्धतीचा वापर करून ही शस्त्रक्रिया केली, ज्यामुळे बालकाच्या गुप्तांगाला गंभीर संसर्ग होऊन त्याचे मोठे नुकसान झाले. शस्त्रक्रियेनंतर बालकाला लघवी करण्यात तीव्र अडचणी आल्याने व प्रकृती बिघडल्याने त्याला त्रिशूर येथील उच्च वैद्यकीय केंद्रात हलवावे लागले, जिथे त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया करून लघवीसाठी वेगळा मार्ग तयार करावा लागला. या दुर्दैवी घटनेमुळे निष्पाप बालकाला आणि त्याच्या पालकांना असह्य शारीरिक व मानसिक यातना सहन कराव्या लागल्या.

या प्रकरणी सुनावणीदरम्यान रुग्णालयाने पालकांनीच औषधोपचारात निष्काळजीपणा केल्याचा दावा करत स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला; परंतु आयोगाने तो पुराव्यांनिशी फेटाळून लावला. जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या () तपासणी अहवालात रुग्णालयाचे निर्जंतुकीकरण आणि स्वच्छता नियम धाब्यावर बसवले गेल्याचे स्पष्ट झाले, तसेच शस्त्रक्रियेसाठी मोनोपोलर कॉटरीचा वापर केल्याने बालकाच्या पेशी नष्ट झाल्याचे समोर आले. आयोगाचे अध्यक्ष मोहनदासन के. आणि सदस्यांनी निरीक्षण नोंदवले की, अवघ्या २३ दिवसांच्या सुदृढ बालकावर ही नियोजित शस्त्रक्रिया करताना रुग्णालयाने सर्वोच्च दर्जाची काळजी घेणे आवश्यक होते. वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बालकाचे भवितव्य धोक्यात आले असून, मानसिक व शारीरिक त्रासापोटी २५ लाख रुपये आणि भविष्यातील वैद्यकीय उपचारांसाठी २५ लाख रुपये अशी एकूण ५० लाख रुपयांची भरपाई देण्याचे आदेश आयोगाने दिले.

रुग्णालयाने फौजदारी तपासातून सुटका झाल्याचा दाखला देत दायित्वातून पळ काढण्याचा प्रयत्न केला होता; मात्र ग्राहक आयोगाने यावर अत्यंत महत्त्वपूर्ण कायदेशीर स्पष्टीकरण दिले. फौजदारी प्रकरणातील गुन्हेगारी निष्काळजीपणा ( ) आणि ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत असणारी वैद्यकीय सेवेतील त्रुटी ( ) या दोन्ही भिन्न बाबी आहेत.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनी डोमेगावात अनोखा सामाजिक उपक्रम

### स्वखर्चातून गल्लाटी नदीवर बांधारा उभारून जलसंधारणाचा संदेश

**अंबड - प्रतिनिधी**

महान लोकशाहीर, साहित्यरत्न व समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त डोमेगाव येथे एक प्रेरणादायी सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. ग्रामपंचायत डोमेगावचे पाणीपुरवठा कर्मचारी बाबासाहेब शेळके यांनी स्वतः च्या ₹१६,८०० इतक्या स्वखर्चातून गल्लाटी नदीमध्ये बांधारा उभारून जलसंधारणास चालना देण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला.



या उपक्रमामुळे परिसरातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होणार असून शेतकरी, जनावरे तसेच भूजल पुनर्भरणालाही मोठा फायदा होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त समाजोपयोगी कार्य करून त्यांना अभिवादन करण्याचा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

या वेळी मा. सरपंच डॉ. अशोक संपतराव काळबांडे, उपसरपंच कल्पना रमेश सांगळे, ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब खांडेभराड, पोलीस पाटील नागनाथ गुलगे, माजी सरपंच बाबासाहेब काळबांडे, कोळी शिरसगाव सोसायटीचे चेअरमन शंकरराव हेमके तसेच ग्रामपंचायत सदस्य यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेब शेळके यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत, जलसंधारण ही काळाची गरज असून अशा लोकसहभागातून राबविण्यात येणारे उपक्रम ग्रामीण विकासाला नवी दिशा देतात, असे मत व्यक्त केले.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य व सामाजिक कार्यातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यांच्या स्मृतिदिनी समाजहिताचा हा उपक्रम राबवून त्यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्यात (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.